जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 SEP 2025
सकाळ

# कुरुंदवाडला उद्या आंतरराष्ट्रीय ई-परिषद

## विविध देश व विद्यापीठांतील नामवंत तज्ज्ञ करणार मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

कुरुंदवाड, ता. ७ : शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभाग (स्वायत्त) व सहकारभूषण एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड येथील अर्थशास्त्र विभाग यांच्या वतीने 'परंपरा आणि आधुनिकतेला जोडणे : मानविकी आणि वाणिज्य क्षेत्रातील ज्ञानाचा पुनर्विचार' या विषयावर मंगळवारी (ता. ९) एकदिवसीय बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय ई-परिषदेचे आयोजन केले आहे.

परिषदेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते होणार आहे. परिषदेचे प्रमुख आयोजक व मार्गदर्शक शिवाजी विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम. एस. देशमुख, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष विजय जयराम पाटील आणि प्र-प्राचार्य डॉ. एस. व्ही. कोठावळे प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी विविध देश व विद्यापीठांतील नामवंत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. त्यात डॉ. प्रवीण जी. सप्तर्षी (व्हिजिटिंग प्रोफेसर, सॅलिसबरी विद्यापीठ, अमेरिका), प्रा. डॉ. मदन मोहन गोयल (कुलगुरू, राजीव गांधी राष्ट्रीय युवा विकास संस्था, भारत सरकार, व स्टारेक्स विद्यापीठ, गुरुग्राम, हरियाणा), डॉ. अनुराग श्रीवास्तव (प्राध्यापक, पोस्ट-डॉक्टरेट, लिंकन विद्यापीठ, मलेशिया), डॉ. मुंथर मोहम्मद इब्राहिम झयौद (अल-कुद्स मुक्त विद्यापीठ, पॅलेस्टिनी प्रदेश – पश्चिम आशिया), डॉ. वेनुप्रसाद सितौला भारध्वाज (प्राचार्य, नेपाळ दयानंद वैदिक मिशन ग्लोबल अकॅडमी, नेपाळ), प्रा. डॉ. एफ. एम. नदाफ (उच्च शिक्षण उपसंचालक, गोवा सरकार), डॉ. विजयानंद सेल्वराज (डेटा स्ट्रॅटेजिस्ट आणि आर्टिफिशियल इंटेलिजेंस लीड, अमेरिका) यांचा समावेश आहे.

परिषदेच्या यशस्वीतेसाठी जास्तीत जास्त प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक डॉ. आबासाहेब जाधव, डॉ. दिग्विजय पाटील, डॉ. पी. पी. कांबळे व प्रा. आर. डी. शिंगे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 SEP 2025
तरुण भारत

# कुरूंदवाडमध्ये उद्या ई आंतरराष्ट्रीय परिषद

**कुरुंदवाड :** शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभाग स्वायत्त व सहकारभूषण एस. के. पाटील कॉलेज कुरूंदवाड अर्थशास्त्र विभागाच्यावतीने ई आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन मंगळवार ९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता केले आहे.

याचे उद्‌घाटन कुलगूरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगूरू डॉ. पी. एस. पाटील या परिषदेचे प्रमूख आयोजक व मार्गदर्शक प्रो. डॉ. एम. एस. देशमूख विभाग प्रमूख अर्थशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, नॅशनल इन्स्टियूट ऑफ एज्यूकेशनचे अध्यक्ष विजय जयराम पाटील, प्र. प्राचार्य डॉ. एस. व्ही. कोठावळे यांच्या हस्ते होणार आहे.

परिषदेसाठी डॉ. प्रवीण जी. सप्तर्षी व्हिजिटिंग प्रोफेसर सॅलिसवरी विद्यापीठ अमेरिका, प्रा. (डॉ.) मदन मोहन गोयल कुलगुरू राजीव गांधी राष्ट्रीय युवा विकास संस्था भारत सरकार स्टारेक्स विद्यापीठ गुरुग्राम हरियाणा, डॉ. अनुराग श्रीवास्तव प्राध्यापक पोस्ट-डॉक्टरेट लिंकन विद्यापीठ मलेशिया, डॉ. मुंथर मोहम्मद इब्राहिम झयौद अल-कुद्ध मुक्त विद्यापीठ पॅलेस्टिनी प्रदेश (पश्चिम आशिया), डॉ.वेनुप्रसाद सितौला भारध्वाज प्राचार्य (नेपाळ )दयानंद वैदिक मिशन ग्लोवल अकादमी नेपाळ, प्रा. (डॉ.) एफ. एम. नदाफ उच्च शिक्षण उपसंचालक गोवा सरकार भारत, डॉ. विजयानंद सेल्वराज डेटा स्टॅटेजिस्ट आणि आर्टिफिशियल इंटेलिजेंस लीड, यूएसए. या आंतरराष्ट्रीय पातळीवरील व देशभरातील विविध तज्ञ व अभ्यासू व्यक्तीचे मार्गदर्शन होणार आहे. तरी जास्तीत जास्त प्राध्यापकांनी, संशोधक व विद्यार्थी यानी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक डॉ. आबासाहेब जाधव, डॉ. दिग्विजय पाटील, डॉ. पी. पी. कांबळे , प्रा. आर. डी. शिंगे यांनी केले आहे.